अंतरिम मार्गदर्शक सूचना

जा.क्र./विप्र-७/आउयो/अंतरिम मासु/१४-१५/460 /२०१४
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे - ४११ ००५
दिनांक :- 2 जून, २०१४

प्रति,

१) मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद --------( सर्व )

२) कृषि विकास अधिकारी,
जिल्हा परिषद --------( सर्व )

विषय :- सन २०१४-१५ मध्ये आदिवासी उपयोजना (क्षेत्रांतर्गत व क्षेत्राबाहेरील) अंतर्गत आदिवासी शेतकऱ्यांना शेतीसाठी अर्थ सहाय्य देण्याची योजना पुर्व तयारीचे दृष्टीने अंतरिम मार्गदर्शक सुचनाबाबत ...

प्रतिवर्षी प्रमाणेच सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात आदिवासी उपयोजना (क्षेत्रांतर्गत व क्षेत्राबाहेरील) अंतर्गत आदिवासी शेतकऱ्यांना शेतीसाठी अर्थसहाय्य देण्याची योजना राज्यात राबविण्यात येईल. या योजनेअंतर्गत लाभार्थी निवड व त्यांना घटकनिहाय द्यावयाच्या अनुदान लाभाबाबत पूर्वनियोजनाच्या दृष्टीने सोबत अंतरिम मार्गदर्शक सुचना सहपत्रित केल्या आहेत. सद्य:स्थितीत शासनाकडून योजनेचा जिल्हानिहाय मंजूर नियतव्यय उपलब्ध व्हायचा आहे. तथापि, पूर्वतयारीच्या दृष्टीने सन २०१३-१४ साठी मंजूर कार्यक्रमाच्या आधारे प्रस्तुत वर्षाच्या मंजूर कार्यक्रमाच्या ७५ टक्के पर्यंत अनुदान विचारात घेऊन पुर्व नियोजनाची कार्यवाही करावी. सदर अंतरीम मार्गदर्शक सुचना सन २०१३-१४ चा शासन निर्णय व मार्गदर्शक सुचनांचे अधिन राहून निर्गमित करण्यात येत असून प्रत्यक्षात सन २०१४-१५ साठी योजनेच्या प्रशासकीय व वित्तीय मान्येतबाबत शासन निर्णय प्राप्त झाल्यावर त्यात काही धोरणात्मक बदल असल्यास, त्यानुसार अनुषंगिक बदल अंतीम मार्गदर्शक सुचनेसोबत आपणांस कळविण्यात येतील, याची कृपया नोंद घ्यावी.

सोबत - अंतरिम मार्गदर्शक सूचना

स्वाक्षरीत /-
संचालक
(विस्तार व प्रशिक्षण)
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रतिलिपी - माहीतीसाठी सविनय सादर.

(१) मा. प्रधान सचिव, (कृषी व फलोत्पादन विभाग) कृषि व पदुम विभाग , मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

(२) मा. सचिव, आदिवासी विकास विभाग मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

(३) मा.आयुक्त, आदिवासी विकास ,आदिवासी विकास आयुक्तालय , नाशिक

प्रत : माहीती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

(१) विभागीय कृषि सहसंचालक, -------------------------------------------- (सर्व)

(२) प्रकल्प अधिकारी, एकात्मीक आदिवासी विकास प्रकल्प--------------------- (सर्व)

(३) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद------------------------ (सर्व)

सन २०१४-१५ करिता आदिवासी उपयोजने अंतर्गत आदिवासी शेतक-यांना कृषि विकासासाठी अर्थसहाय्य देण्याची योजना (क्षेत्रांतर्गत व क्षेत्राबाहेरील) अंतरिम मार्गदर्शक सुचना

प्रस्तावना :-

आदिवासी उप योजना क्षेत्रातील /आदिवासी उप योजना क्षेत्राबाहेरील आदिवासी शेतक-यांना शेतीसाठी अर्थसहाय्य देण्याची योजना राज्यात सन १९९३-९४ पासून राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत १) जमीन सुधारणा २) निविष्ठा पुरवठा ३) पीक संरक्षण अवजारे/शेतीची सुधारीत अवजारे ४) बैलगाडी ५) बैलजोडी/रेडेजोडी वाटप ६) इनवेल बोअरिंग ७) जुनी विहीर दुरुस्ती ८) पाईप लाईन ९) पंप संच १०) नवीन विहीर ११) शेततळे १२) परसबाग १३) तुषार/ठिबक संच या बाबींवर आदिवासी प्रवर्गातील शेतक-यांना अनुदानाचा लाभ देण्यात येते. प्रचलीत पध्दतीप्रमाणे सन २०१४-१५ मध्ये सदर योजना राबविण्यासाठी खालील प्रमाणे अंतरीम मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

योजनेचे उद्दिष्ट :- आदिवासी शेतक-यांचे कृषि उत्पादन वाढीस सहाय्य करुन त्यांच्या आर्थिक उन्नतीस मदत करणे

१. लाभार्थी निवडीचे निकष :-

१.१ जमीन धारणा :- ज्या शेतक-यांकडे त्यांच्या स्वतःचे नावे ६.०० हेक्टर किंवा त्यापेक्षा कमी शेतजमीन असेल असे शेतकरी लाभार्थी म्हणून निवडीस पात्र राहतील. त्यासाठी जमिन धारणेचा अ'द्ययावत दाखला ७/१२ व ८अ सादर करणे संबंधीत लाभधारकास बंधनकारक राहील. सदर ७/१२ व ८अ बाबत काही समस्या उद्भवल्यास त्याची जबाबदारी संबंधित कागदपत्रे स्वाक्षरीत करणाऱ्या कर्मचारी/अधिकारी यांची राहील.

१.२ जातीबाबतचा दाखला :- लाभार्थी हा आदिवासी शेतकरी असणे बंधनकारक आहे. दारिद्र्य रेषेखालील (बी.पी.एल) यादीमध्ये ज्या आदिवासी जमातीच्या व्यक्तीचे नाव समाविष्ठ असेल अशा लाभधारकांसाठी शासनाने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीच वैध दाखला ग्राह्य धरावा. त्याबाबत काही समस्या उद्भवल्यास त्याची जबाबदारी संबंधित दाखला देणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांची राहील. विशेष घटक योजनेंमध्ये दारिद्र्य रेषेखालील अनुसुचित व्यक्तीसाठी ज्या योजना असतील त्या योजनेकरीता समाजकल्याण विभागाच्या दिनांक ७ जानेवारी १९९७ चे सुचनांप्रमाणे पुन्हा तहसिलदार यांच्या सहीचा जातीचा दाखला आणणे आवश्यक राहत नाही. त्याच धर्तीवर दारिद्र्य रेषेखालील आदिवासी व्यक्तीसाठी पुन्हा तहसिलदार यांच्या सहीचा दाखला आवश्यक राहणार नाही.

दारिद्र्य रेषेखालील यादीमध्ये (बीपीएल) लाभार्थ्याचा समावेश नसेल तर अशा लाभार्थीसंबंधी प्रस्तुत योजनेंतर्गत लाभार्थी निवडीच्या सुचना खालीलप्रमाणे आहेत.

१.३ उत्पन्नाचा दाखला : दारिद्र्य रेषेखालील (बीपीएल) यादीत अंर्तभुत शेतक-यांसाठी वार्षिक उत्पन्नाच्या मर्यादेची अट राहणार नाही. मात्र, अन्य आदिवासी शेतक-यांच्या बाबतीत ज्या शेतक-यांची जमीनधारणा ६ हेक्टर किंवा त्यापेक्षा कमी आहे आणि ज्यांचे सर्व मार्गांनी मिळणारे वार्षिक उत्पन्न रुपये २५,०००/- चे मर्यादेत आहे असे शेतकरी लाभासाठी पात्र ठरतील. अशा शेतक-यांना संबंधीत तहसिलदार यांचेकडून उत्पन्नाचा अ'ावत दाखला घेणे व अर्जासोबत सादर करणे बंधनकारक राहिल.

२. लाभार्थीची निवडीचा प्राधान्यक्रमः

२.१. दारिद्र्य रेषेखालील आदिवासी शेतकरी ज्यांची जमीनधारणा सहा हेक्टर किंवा त्यापेक्षा कमी आहे अशा इच्छूक शेतकऱ्यांची खालील प्राधान्य क्रमाने जिल्हा निवड समितीने निवड करावी.

अ) २ हेक्टर पर्यन्त जमीनधारणा असलेल्या शेतक-यांना प्रथम प्राधान्य देण्यात यावे.

ब) २ हेक्टर ते ४.०० हेक्टर जमीनधारणा असलेल्या शेतक-यांना द्वितीय प्राधान्य

क) ४.०० ते ६.०० हेक्टर जमीनधारणा असलेल्या शेतक-यांना तृतीय प्राधान्य.

२.२.	शेतकरी स्वतः शेती विकास योजनेची कामे हाती घेण्यास इच्छूक असावा.

२.३.	आदिवासी उपयोजना क्षेत्रातील आणि आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील लाभार्थी निवडतांना लाभार्थी हे शासन निर्णयानुसार खालील टक्केवारीत कातकरी, कोलाम व माडिया गोंड या आदिम जमातीचे असण आवश्यक राहील.

| अ.क्र. | आदिम जमातीचे नाव | जिल्ह | टक्केवारी |
|---|---|---|---|
| अ | कातकरी | ठाणे, रायगड, रत्नागीरी, पुणे, नाशिक<br>इतर जिल्हे | २० %<br>१० % |
| ब | कोलाम | यवतमाळ, चंद्रपूर, नांदड<br>इतर जिल्हे | २० %<br>१० % |
| क | माडिया गोंड | गडचिरोली | २५ % |

२.४.	जिल्हयातील अत्यंत मागासलेल्या तालुक्यातील (उदा. नंदुरबार जिल्हयातील अक्कलकुवा, धडगाव) जास्तीत जास्त लाभार्थी निवडण्यात यावे. या धर्तीवर इतर तालुका निहाय उद्दिष्ट तयार करून कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद यांनी कृषि आयुक्तालयास व आयुक्त, आदिवासी विकास आयुक्तालय, नाशिक यांना पाठवावे.

२.५.	वनग्रामातील व वनजमीनीचा एक साली लीज धारकापैकी ज्या लाभार्थीकडे ७/१२ उतारा नाही, परंतु त्यांच्याकड जमीनीचा प्रत्यक्ष ताबा आहे व जिल्हाधिका-यांकडे अतिक्रमण नियमीत करण्याबाबत व पट्टा देणेबाबत वन विभागातर्फ़े तयार करण्यात आलेल्या व केंद्र शासनाकड शिफ़ारस करण्यात आलेल्या आदिवासी शेतक-यांची खात्री करुन या योजनेतील देय घटकांचा मागणीनुसार लाभ  देण्यात यावा.

२.६.	एकाच व्यक्तीला एकापेक्षा जास्त वेळा लाभ मिळणार नाही, याची खात्री करूनच योजनेतील घटकांचा लाभ द्यावा. एकापेक्षा जास्त वेळा लाभ दिल्याचे आढळून आल्यास संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन कठोर कारवाई करण्यात येईल.

२.७.	लाभार्थीना लाभ देते वेळी समुह विकास (Cluster approach ) दृष्टीकोन समोर ठेवून मागास तालुक्यातील अत्यंत मागासलेल्या गावाची  निवड करून प्राधान्याने लाभ देण्यात यावा.

३. लाभार्थी निवड समिती :- या योजनेंतर्गत तालुका स्तरावर गट विकास अधिकारी यंानी योजनेस विविध प्रसिध्दी माध्यमांद्वारे व्यापक प्रमाणात प्रसिध्दी द्यावी.  योजने बाबत सविस्तर माहिती ठळकपणे सूचना-फलकावर लावावी. लाभधारकांकडून अर्ज/प्रस्ताव मागवावेत. लाभार्थ्यांच्या निवडीबाबत ग्रामसभेस अवगत करावे. प्राप्त अर्जांची /प्रस्तावांची योजनेच्या निकषांआधारे काटेकोरपणे छाननी करावी. पात्र ठरणाऱ्या अर्जदारांची यादी त्यांनी तात्काळ जिल्हास्तरीय समितीकडे शिफारसीसह पाठवावी. अपात्र ठरणाऱ्या अर्जदारास त्याचे कारणांसह उणिवांच्या पूर्ततेस पुरेसा कालावधी देऊन तसे लेखी कळवावे. अर्जदाराने संबंधितांनी उणिवांची पूर्तता केल्यास त्याबाबत खात्री करावी व ज्या दिनांकास परिपूर्ण अर्ज/प्रस्ताव प्राप्त होईल त्या दिनांकास तो क्रमवारीत नोंदवावा. तालुकास्तरावर तयार करण्यात येणाऱ्यां पात्र अर्जदार/लाभधारकांचे बाबत भविष्यात काही उणिवा/समस्या उद्‌भवयास त्यास संबंधीत गट विकास अधिकारी सर्वस्वी जबाबदार राहतील.

पंचायत समिती स्तरावरुन जिल्हा परिषद कार्यालयास प्राप्त होणाऱ्या पात्र अर्जदारांच्या तयार केलेल्या संभाव्य यादीमधून लाभार्थ्यांची निवड करण्यासाठी जिल्हा स्तरावर खालीलप्रमाणे समिती राहील.

| | | |
|---|---|---|
| अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. | - | अध्यक्ष |
| जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी | - | सदस्य |
| कार्यकारी अभियंता, लघुसिंचन, जि.प. | - | सदस्य |
| भूजल सर्वेक्षण यंत्रणेचे जिल्हास्तरीय अधिकारी | - | सदस्य |
| प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प | - | सदस्य |
| कृषि विकास अधिकारी, जि. प. | - | सदस्य सचिव |

सदर समितीने सर्व प्राप्त अर्जांची/प्रस्तावांची योजनेच्या निकषांआधारे काटेकोरपणे छाननी करावी. छाननीअंती पात्र ठरणा-या अर्जदारांची/प्रस्तावांची यादी गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांना कळवावी. अपात्र ठरणा-या अर्जदारांस त्याचे कारणांसह उणीवांच्या पूर्ततेस पुरेसा कालावधी देवून तसे लेखी कळवावे. अर्जदाराने संबंधीतांनी उणीवांची पूर्तता केल्यास त्याबाबत खात्री करावी व ज्या दिनांकास परिपूर्ण अर्ज/प्रस्ताव प्राप्त होईल त्या दिनांकास तो क्रमवारीत नोंदवावा. जिल्हास्तरावर अंतीम करण्यात येणा-या पात्र अर्जदार/लाभधारकांचेबाबत भविष्यात काही उणीवा/समस्या उदभवल्यास त्यास कृषि विकास अधिकारी जबाबदार राहतील. निवड अंतीम करताना महीला लाभार्थी, अपंग लाभार्थी इत्यादींबाबत शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश विचारात घेवून प्रमाणानुसार संबंधीत लाभार्थींची निवड करणे ही जिल्हास्तरीय समितीची जबाबदारी राहील. ‘‘प्रथम प्राप्त प्रथम प्राधान्य’’ या तत्वानुसार लाभार्थी निवडीची प्रक्रीया करावी.

सदर योजना दोन आर्थिक वर्षात राबविण्यात येत असल्याने मागील आर्थिक वर्षात निवडलेल्या लाभार्थ्यांपैकी ज्यांनाप अपूर्ण लाभ दिला आहे त्यांना उर्वरीत लाभ देण्यासाठी लागणारा निधी विचारात घेवून शिल्लक राहणाऱ्या निधीतून नवीन लाभार्थींची निवड करावी. शासनाकडून प्रत्याक्षात उपलब्ध होणाऱ्या निधीच्या प्रमाणातच लाभार्थी निवड अंतीम करावी, जेणेकरुन प्रकरणे प्रलंबीत राहण्याचा व शासनावर अतिरिक्त आर्थिक बोजाचा प्रश्न भविष्यात निर्माण होणार नाही.

४. लाभार्थ्यांची निवड रद्द करणे : लाभार्थीच्या निवडीचे अंतीम अधिकार जिल्हास्तरीय समितीला राहतील. खालील कारणांमुळे जर काही लाभार्थीची निवड रद्द करणे क्रमप्राप्त असल्यास त्याचेही सर्वस्वी अधिकार जिल्हा स्तरीय समितीस राहतील.

४.१ समितीने निवड केलेला शेतकरी मयत झाल्यास.

४.२ निवड झालेला शेतक-याने आपली सर्व शेतजमीन विकून तो भुमीहीन झाला असल्यास.

४.३. निवड झालेला शेतकरी शेती विकास योजना हाती घेण्यास इच्छूक नसल्यास.

४.४. निवड झालेला शेतक-याने अर्थसहाय्य घेण्यास नकार दिल्यास.

४.५. निवड झालेला शेतकरी योजनेखाली घेतलेल्या अनुदानाचा गैरवापर करत असल्याचे निदर्शनास आल्यास.

४.६. लाभार्थीची निवड शासनाने विहीत केलेल्या निकषांनुसार झाली नसल्याचे आढळून आल्यास.

वरील परिस्थितीमुळे लाभार्थ्याची निवड रद्द झाल्यास त्याबाबत कागदोपत्री सर्व आवश्यक पुरावे ठेवून तसे लाभधारकास लेखी कळविणे कृषि विकास अधिकारी यांना बंधनकारक राहील.

४.७. मयत झालेल्या लाभधारकाबाबत त्यांचे कायदेशीर वारसांची निवड जिल्हा स्तरीय समितीने करावी व शिल्लक राहिलेले अर्थसहाय्य त्यांना देण्यात यावे. याबाबत कायदेशीर बाबींची सर्वतोपरी पूर्तता करुन घेण्याची जबाबदारी जिल्हा स्तरीय समितीची राहील.

वरील कारणामुळे लाभार्थ्याची निवड रद्द करुन त्याऐवजी विहीत केलेल्या अटींची पूर्तता करणा-या पुढील लाभार्थ्याची विहित पध्दतीने निवड जिल्हा स्तरीय समितीने करावी.

लाभार्थींना योजनेचा लाभ वेळेवर देण्याचे दृष्टीने माहे जून २०१४ अखेर लाभार्थी निवडीची प्रथम प्रक्रीया पूर्ण करणे अनिवार्य आहे. त्यासाठी कालबध्द कार्यक्रम कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद यांनी तयार करुन सर्व गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांना कळवावा व त्याचे संनियंत्रण करावे. प्रत्यक्षात मंजूर झालेला कार्यक्रम विचारात घेवून प्रत्यक्षात उपलब्ध निधीच्या मर्यादेत निवड केलेल्या लाभार्थींना लाभ द्यावा व अतिरिक्त लाभार्थींची आवश्यकता असल्यास प्रतिक्षायादीवरील लाभार्थींची योग्य प्रमाणात निवड करावी. माहे जुलै ते ऑक्टोबर या कालावधीत योजनेतील नवीन विहीर या बाबी व्यतिरिक्त अन्य बाबींचा लाभार्थींना पूर्ण लाभ देणे आवश्यक राहील. त्यानुसार नियोजन करण्याची दक्षता घेण्यात यावी. जेणेकरुन अन्य बाबींची प्रकरणे प्रलंबीत राहणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

सदर योजनांतर्गत निवड करण्यांत आलेल्या लाभार्थ्याना दोन आर्थिक वर्षाच्या कालावधीत लाभार्थ्याच्या गरजेनुरुप विविध घटकांचा उपलब्ध अनुदान मर्यादेपर्यंत लाभद्यावयाचा आहे. त्यानुसार सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात निवड करण्यांत आलेल्या मात्र देय अनुदानाच्या कमाल मर्यादेपर्यत पूर्ण लाभ न मिळालेल्या लाभार्थ्याना प्राधान्याने सन २०१४-१५ मध्ये लाभ देण्यात यावा. तद्नंतर उर्वरीत निधीच्या मर्यादेत सन २०१४-१५ करीता नविन लाभार्थी निवडून नव्याने निवडलेल्या लाभार्थ्यांना लाभ देताना प्रत्यक्ष प्राप्त अनुदातून जेवढ्या लाभार्थींना पूर्ण लाभ देता येईल तो प्राथम्याने पूर्ण करावा, जेणेकरुन मागील आर्थिक वर्षात निवडलेल्या लाभार्थ्यांची प्रकरणे प्रलंबित राहणार नाहीत, याची दक्षता घ्यावी. मागील प्रकरणांवरुन असे निदर्शनास येते की, मागील आर्थिक वर्षात अपूर्ण लाभ दिलेल्या लाभार्थींचा उर्वरित लाभ पूर्ण न करता नविन आर्थिक वर्षात नविन लाभार्थी निवड करुन त्यांना लाभ दिला जातो. तद्नंतर लाभ देण्याचा दोन वर्षांच्या कालावधीची मुदत संपल्यावर अपूर्ण लाभार्थींना लाभ देण्याचे दृष्टीने मुदतवाढ देण्यासाठी आग्रह धरला जातो. ही कार्यवाही शासनाच्या सुचनांशी विसंगत ठरते. त्यामुळे जिल्हयासाठी मंजूर आर्थिक लक्षांकातून प्रथमतः सन २०१३-१४ मधील अपूर्ण लाभ दिलेल्या शेतक-यांना प्राधान्याने लाभ दयावयाची रक्कम निश्चित करावी व नंतर उर्वरीत अनुदानातून नव्याने लाभार्थांची निवड करावी. चालु आर्थिक वर्षात निवड केलेल्या लाभार्थ्यानां लाभ द्यावयाचे घटक लाभार्थींची लेखी मागणी घेवून निश्चित करावेत  व त्यानुसार कार्यक्रम आराखडा तयार करावा.

५.प्रसिध्दी : या योजनेची माहिती सर्व शेतकरी बांधवांना व्हावी या दृष्टिने विभागीय स्तरावर विभागीय कृषि सह संचालक व जिल्हा स्तरावर कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद यांनी व्यापक प्रमाणात प्रसिध्दी द्यावी. गट विकास अधिकारी यांनी तालुका स्तरावर व्यापक प्रमाणात प्रसिध्दी द्यावी. आपल्या क्षेत्रातील स्वयंसेवी संस्थांशी संपर्क साधून त्यांच्या मार्फत देखील प्रसिध्दी द्यावी. सदर योजनेची सविस्तर माहिती पंचायत समिती स्तरावर गट विकास अधिकारी, कृषि अधिकारी (वि.घ.यो.) तसेच जिल्हा स्तरावर जिल्हा कृषि अधिकारी (वि.घ.यो.) यांच्याकडे उपलब्ध असावी. लाभ दिलेल्या लाभार्थ्यांची यादी ग्रामसभेस सादर करण्यात यावी.

५.१ योजनेची माहिती सर्व सामान्य लोकांना व स्वयंसेवी संस्थाना होण्याकरीता स्थानिक वर्तमान पत्रात, गावात दवंडी या द्वारे प्रसिध्दी देण्यांत यावी. विभागीय संपर्क कक्ष, माहिती व जनसंपर्क मंत्रालय , मुंबई यंाच्या दि. २२ मार्च, २००२ रोजीच्या सुचने नुसार ग्रामिण/शहरी अनुसुचित जमातीतील  घटकांना आदिवासी उप योजने संबंधीची माहिती मिळणे संदर्भात प्रदर्शने आयोजित करण्यात येतात, सदर प्रदर्शनास उपस्थित राहुन जास्तीत जास्त प्रसिध्दी देण्यांत यावी.

६. प्रकल्प तयार करणे  : सदर  योजनेतंर्गत लाभार्थ्याची निवड करण्यासाठी तालुकास्तरावर गट विकास अधिकारी यांनी कृषि अधिकारी (वि.घ.यो.) यांच्यामार्फत विहीत नमुन्यात लाभार्थीकडून अर्ज मागवावेत. अर्जाची छाननी करुन पात्र ठरणाऱ्या लाभार्थ्यांची गट विकास अधिकारी यांनी परिच्छेद (३) मध्ये नमुद केलेल्या जिल्हा निवड समितीच्या सदस्य सचिवाकडे सादर करावी.

६.१. जिल्हा निवड समितीने निवड केलेल्या लाभार्थी शेतक-यांचा कृषि उत्पादन वाढविण्यासाठी गट विकास अधिकारी यांनी आराखडा तयार करण्यात यावा.

६.१.१. प्रत्येक जिल्हयांचा विस्तार व फलोत्पादन विकास आराखडा तयार करण्यात येतो त्यामध्ये या योजनेचा न चुकता अंतर्भाव करण्यात यावा.

६.१.२. लाभार्थ्यांना सोबतच्या परिशिष्ट (एक) नुसार योजनेतंर्गत समाविष्ट असलेल्या घटकांपैकी एक किंवा अधिक घटकांचा लाभ त्यांच्या गरजेनुसार घेता येईल. नविन विहीर या घटकाचा ज्या लाभार्थ्याने लाभ घेतला आहे त्यांना भूस्तर प्रकारानुरुप सद्य:स्थितीतील अनुदान मर्यादा रु. ७०,०००/- ते रु. १,००,०००/- पर्यंत लाभ अनुज्ञेय राहील. भूजल सर्वेक्षणानुसार विविध जिल्हयांसाठी ठरविण्यात आलेल्या भूस्तर प्रकाराच्या खर्चाचे मापदंडाचे अधीन राहून अनुदान अनुज्ञेय राहील. नविन विहीर घटकाचा लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यास सदर योजनेतील इतर घटकांचा लाभ अनुज्ञेय राहणार नाही. नविन विहीर या घटकाचा लाभ शक्यतो महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजना या केंद्र शासनाच्या योजनेतून देवून विशेष घटक योजनांतर्गत नविन विहीर या घटका व्यतिरिक्त योजनेतील इतर घटक प्रामुख्याने सुक्ष्म सिंचन, पंपसंच, पाईपलाईन, निविष्ठा व सुधारित औजारे यांचा लाभ दिल्यास लाभार्थीला सिंचन सुविधेसह कृषि उत्पादन वाढीसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध होतील आणि पर्यायाने त्याच्या उत्पन्नास स्थैर्य प्राप्त होईल या दृष्टीने लाभार्थ्यास उद्युक्त करावे. नविन विहीर या घटका व्यतिरिक्त इतर घटकांचा लाभ घेण्याऱ्या लाभार्थ्यांना लाभाची कमाल मर्यादा रुपये ५०,०००/- राहील. अशा लाभार्थ्यांचा लाभ शक्यतो त्याच आर्थिक वर्षात पूर्ण करण्याचा प्रयत्न करावा.

६.२ योजनेचे मूल्यमापन त्रयस्थ यंत्रणेमार्फत करुन घ्यावयाचे असल्याने योजनेतील लाभार्थी व त्यांना दिलेले लाभ याबाबत सन १९९२-९३ पासूनची माहिती, लाभार्थीच्या याद्या, दिलेल्या घटकांचे लाभ व प्रत्यक्ष झालेल्या खर्चाची घटकनिहाय माहिती संकेत स्थळावर लोड करावी. याबाबत स्वतंत्ररित्या परिपत्रक निर्गमित करण्यात आले आहे. सदर माहीती तात्काळ आयुक्तालयास सादर करावी. योजनेच्या फलश्रुतीबाबत संबंधी कृषि विकास अधिकारी यांनी प्रति वर्षी समग्र अहवाल आयुक्तालयास दोन प्रतीत सादर करावा.

६.३. यापूर्वी आपल्या जिल्हयात राबविण्यात आलेल्या सदर योजनेतील लाभार्थ्यांची यशोगाथा रंगीत फोटोसह तयार करण्यात यावी. लोकप्रतिनिधींना सदरची कामे दाखवून त्यांचे अभिप्राय घ्यावेत.यशोगाथा व लोक प्रतिनिधींचे अभिप्राय कृषि आयुक्तालयास दोन प्रतीत तात्काळ पाठविण्यात यावेत.

६.४ योजनेचा लाभार्थ्यांना लाभ देतांना अनुदानाची रक्कम रोख स्वरुपांत न देता वस्तुरुपाने द्यावयाची आहे. ज्या ठिकाणी आवश्यक असेल अशा बाबीकरीता लाभार्थ्याचे बॅकेत खाते उघडून खात्यावर अनुदानाची रक्कम जमा करण्यांत यावी.

६.५ वैयक्तिक लाभार्थी निवडतांना महिला लाभार्थीना निर्धारित झालेल्या प्रमाणात प्राधान्य देण्यात यावे.

६.६ एकूण मंजूर निधीपैकी ३ टक्के निधी आदिवासी अपंग शेतकऱ्यांसाठी राखून ठेवावा. परंतू असे लाभार्थी प्रयत्न करुनही उपलब्ध झाले नाहीत तर त्याबाबत आवश्यक अभिलेख संग्रहीत ठेऊन इतर आदिवासी शेतकऱ्यांना लाभ देण्यात यावा.

६.७ सन २०१२-१३ व सन २०१३-१४ मध्ये लाभ दिलेल्या लाभधारकांची यादी जिल्हा परिषद/पंचायत समिती/जिल्हा अधिकारी/आदिवासी विभागाच्या कार्यालयात लावण्यात यावी. अनुदानाची नोंद पंचायत समिती स्तरावर स्वतंत्र रजिस्टरमध्ये ठेवण्यांत यावी. सदर रजिस्टर कृषि अधिकारी ( वि.घ.यो.) पंचायत समिती यांनी प्रमाणित करावे. त्याची गट विकास अधिकारी यांनी वेळोवेळी तपासणी करुन वेळोवेळी साक्षांकीत करावे. सदर अभिलेख वेळोवळी तपासणीसाठी तपासणी अधिकाऱ्यास उपलब्ध करुन द्यावेत.

६.८. चालु वर्षाचा आराखडा करताना मागील वर्षाच्या लाभार्थी साठी आवश्यक असलेले अनुदान व चालु वर्षात निवड केलेल्या लाभार्थ्यांना आवश्यक असलेले अनुदान हे एकुण मंजुर झालेल्या निधीपेक्षा जादा राहणार नाही याची कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद यांनी खात्री करावी.

६.९. लाभार्थीची निवड केल्यानंतर लाभार्थीची यादी तयार करुन विभागीयस्तरावर विभागीय कृषि सहसंचालक, जिल्हास्तरावर कृषि विकास अधिकारी, पंचायत समिती स्तरावर गट विकास अधिकारी यांचे कार्यालयात ठेवावी. कार्यक्रम अंमलबजावणी झाल्यानंतर लाभार्थीची यादी जिल्हा परिषदेच्या संकेत स्थळावर ठेवण्यात यावी. तसा उल्लेख मासिक प्रगती अहवालात करण्यांत यावा.

७. अनुदानाचे स्वरुप/पध्दतीः या योजने अंतर्गत निवड केलेल्या लाभार्थ्यांना अनुज्ञेय अनुदानाची रक्कम रोख स्वरुपात देय नसून योजनेतील मंजूर घटकांद्वारे द्यावयाची आहे. नविन विहीर, जुनी विहीर दुरुस्ती, बैल/रेडेजोडी याबाबींसाठी अनुदानाची रक्कम लाभार्थ्यांचे बॅन्क खात्यात जमा करण्यात यावी.

या योजनेमध्ये एकूण तेरा बाबींवर अर्थसहाय्य देय आहे. तथापी, प्रती लाभार्थी अनुज्ञेय उच्चतम अनुदान मर्यादेनुसार (मुद्दा क्र.६.१.२) लाभार्थीस लाभ अनुज्ञेय राहील. लाभार्थ्यास कोणत्या बाबींची निकड आहे हे त्यांचेकडून लेखी घेवून त्याप्रमाणेच लाभ देण्यात यावा.

८. खर्चाचे नियोजन :-

प्रत्येक लाभार्थीची आर्थिक स्थिती, त्यांची एकूण जमीन व इतर साधनांची उपलब्धता विचारात घेऊन त्या लाभार्थ्यास कोणकोणत्या बाबींवर अर्थसहाय्य द्यावयाचे आहे याबाबतचा प्रारुप आराखडा लाभार्थीच्या सहमतीने तयार करावा. अशा प्रकारचा आराखडा तालुका स्तरावर कृषि अधिकारी (वि.घ.यो.) व जिल्हा स्तरावर संबंधित जिल्हा कृषि अधिकारी (वि.घ.यो.) यांनी तयार करावा व त्याप्रमाणे वित्तीय वर्षात बाबवार खर्चाचे नियोजन करण्यात यावे.

९. योजनेच्या अंमलबजावणीचा कालावधीः या योजने अंतर्गत निवड करण्यात येणा-या प्रत्येक लाभार्थीसाठी योजना राबविण्याचा कालावधी दोन आर्थिक वर्षाचा राहील. म्हणजेच, लाभार्थीची निवड झालेले आर्थिक वर्ष व त्याच्या पुढील आर्थिक वर्ष अशा दोन वर्षाच्या कालावधीत लाभ देण्यात यावा. मागील आर्थिक वर्षात अपूर्ण लाभ दिलेल्या लाभार्थींचा उर्वरित लाभ पूर्ण दिल्यानंतरच चालु आर्थिक वर्षात नविन लाभार्थी निवड करुन त्यांना लाभ देण्यात यावा. जेणेकरुन मागील आर्थिक वर्षात निवडलेल्या लाभार्थ्यांना परिपूर्ण लाभ देऊन प्रकरणे प्रलंबित राहणार नाहीत. प्रस्तुत कालावधीतच संपूर्ण लाभ देण्याचे दृष्टीने नियोजन व अंमलबजावणी करावी.

१०. अनुदानाच्या गैरवापरास प्रतिबंधः-

१०.१. या योजनेत निवड झालेल्या लाभधारक शेतक-यांनी अनुदानाचा गैरवापर केल्याचे सिध्द झाल्यास, अशा लाभार्थ्याकडून अनुदानाची वसुली करण्यात येऊ नये तथापि अशा लाभार्थ्यांना या याजनेत त्यापुढे कोणत्याही प्रकारचा लाभ देऊ नये. अशा लाभार्थ्याचे नाव काळया यादीत टाकून सर्व संबंधित इतर विभागांना पाठविण्यात यावी अशा शासनाच्या पत्रान्वये सूचना आहेत. या योजनेतंर्गत निवड झालेला शेतकरी अर्थसहाय्याचा दुरुपयोग करणार नाही यासाठी योजना राबविणा-या अधिका-यांनी वेळावेळी भेटी देऊन तपासणी करावी व त्यादूष्टीने उपाय योजना करावीत. दिलेल्या प्रत्येक भेटीची नोंद त्यांच्या दौरा दैनंदिनीत ठेवावी.

१०.२. लाभार्थीची निवड करताना शासनाने विहीत केलेल्या निकषांनुसार निवड झाली नसल्याचे सिध्द झाल्यास चुकीच्या निवडीबाबत, तसेच लाभधारकाला देण्यात आलेल्या अनुदानाच्या रक्कमाबांबत काही गैरव्यवहार झाल्याचे सिध्द झाल्यास त्याची जबाबदारी निश्चित करुन संबधित कर्मचारी /अधिका-यांकडून लाभार्थ्यांना दिलेल्या अर्थसहाय्याची रक्कम एकरकमी वसुल करण्यात येईल.

११. लेखा पध्दती :- लाभार्थ्यांना देण्यात येणाऱ्या बाबवार अर्थसहाय्याची योजनानिहाय, बाबनिहाय व लाभार्थीनिहाय नोंद करण्याकरिता पंचायत समिती स्तरावर नोद वही ठेवण्यात यावी व त्यामध्ये लाभार्थ्यांना देण्यात आलेल्या अनुदानाची बाबनिहाय नोंद ठेवण्यात यावी. तसेच जिल्हा कृषि अधिकारी (वि.घ.यो.) यांनी जिल्हा परिषद स्तरावर देखील लाभार्थ्यांना देय व देण्यात आलेल्या लाभ घटकांची नोंद नोंदवहीत ठेवणे बंधनकारक आहे. या नोंदवहीची तपासणी कृषि विकास अधिकारी यांनी वेळोवेळी करुन त्यातील नोदी साक्षांकित करणे बंधनकारक राहील. पंचायत समिती स्तरावरील नोंदवहया व अभिलेख जिल्हा कृषि अधिकारी (वि.घ.यो.)/कृषि विकास अधिकारी यांनी भेटीच्या वेळी तपासून तशी नोंद पंचायत समिती स्तरावरील नोंदवहीमध्ये घेण्यात यावी. सदर अभिलेख वेळोवेळी अ'यावत करावेत व तपासणीवेळी तपासणी अधिकाऱ्यास उपलब्ध करुन द्यावेत.

लाभार्थ्यांना दिलेल्या अर्थसहाय्याची लाभार्थी स्तरावर नोंद ठेवण्यासाठी लाभार्थी नोंद पुस्तिका देण्यात यावी. या नोंद पुस्तिकेत दिलेल्या अर्थसहाय्याची नोंद वेळोवेळी संबंधित अधिकाऱ्यांनी न चुकता करावी व त्यावर स्वाक्षरी करावी.

११ (अ) आदिवासी उपयोजनेचा निधी अर्थसंकल्पीत करणे :-

आदिवासी उपयोजनेचा निधी अर्थसंकल्पीत करणे, वितरीत करण व या निधीतील कामांना प्रशासकीय मान्यता देण्याबाबतची सुधारीत कार्यपध्दती नुसार आदिवासी विकास विभागाच्या शासन निर्णय क्र. टिएसपी -२००८/ प्रक्र. ६/का.६ मंत्रालय मुंबई दि. १६ डिसेंबर २००९ नुसार खालीलप्रमाणे कार्यवाही बाबत सुचना दिलेल्या आहेत.

(i) संबंधित जिल्हयाचे जिल्हाधिकारी हे त्या जिल्हयाच्या आदिवासी उपयोजनेसाठी निधी वाटपा संबधात नियंत्रक अधिकारी राहतील. हे त्यांना प्राप्त झालेल्या निधीचे कार्यान्वयीन यंत्रणला पुर्नवाटप करण्यास ते सक्षम राहतील.

(ii) आदिवासी उपयोजनेचे रुपांतर जिल्हाधिकारी कार्यालयांनी अर्थसकल्पीय विवरणपत्रात आदिवासी उपयोजनेच्या लेखाशिर्षाखाली करावे. संबधीत कार्यान्वयीन यंत्रणांच्या सल्ल्याने प्रतिमाह खर्चाचा तपशिल निधी (Cash Flow) तयार करावा.

(iii) जिल्हा योजनेतील केंद्र पुरस्कृत योजनेतील राज्य हिश्शाची तरतूद जिल्हा योजनेमध्ये करून अर्थसंकल्पीय तरतूद वाटप जिल्हाधिकारी कार्यान्वयीन यंत्रणला करतील.

(iv) जिल्हाधिकारी यांनी आदिवासी विकास विभागाकडून निधी प्राप्त झाल्यापासून जास्तीत जास्त एक महिन्याचे आत कार्यन्वयीन यंत्रणांना निधीचे वाटप करणे आवश्यक राहील. एखाद्या जिल्हाधिका-याने सदर जबाबदारी वेळीच पार पाडली नाही तर संबधीत विभागीय आयुक्त यांनी संबधीत जिल्हाधिका-याकडून निधी वाटपाचे काम पूर्ण करून घेणे अनिवार्य राहील.

(v) आदिवासी उपयोजनेतील जिल्हास्तरीय योजनांचे मासिक खर्चाचे अहवाल दरमहा ५ तारखेपर्यंत जिल्हाधिकारी यांना संबधीत कार्यन्वयीन यंत्रणा सादर करतील .

वरील सुचनानुसार कृषि विकास अधिकारी, जिल्हा परीषद यांनी जिल्हास्तरीय आराखडा तयार करून त्यानुसार जिल्हा नियोजन विकास परिषद (डीपीडीसी) मध्ये आवश्यक तरतुद मंजूर करून घ्यावी .त्यानुसार जिल्हाधिकारी यांना निधी प्रवाह (Cash Flow) सादर करुन अनुदान उपलब्ध करून घ्यावे व खर्चाची कार्यवाही करावी. केलेल्या कार्यवाहीचा मासिक प्रगती अहवाल जिल्हाधिकारी व कृषि आयुक्तालयास दरमहा १० तारखेपर्यत सादर करावेत. जिल्हाधिकारी कार्यालयास निधीची मागणी करून अनुदान उपलब्ध करून घेण्याची सर्व जबाबदारी कृषि विकास अधिकारी, जिल्हा परीषद यांची राहील.

११ (ब) अन्य प्रचलीत योजनांचा लाभ देणे (**Convergence of ongoing Schemes)**

राज्यात अनुसूचित जमातीमध्ये दारिद्रय व कुपोषणाचे प्रमाण अधिक आहे. त्यामुळे त्यांना अन्न सुरक्षा देवून आर्थिक उन्नतीस सहाय्य करणे. त्याचं विकासाच्या नियोजनांचा प्रमुख भाग राहिल. यापूर्वी सदर योजनेखाली निविष्ठा पुरवठयावर भर देण्यात येत होता. तथापि, पुढील काळात यात अमुलाग्र बदल करुन प्रत्येक कुटुंबातील किमान एका युवकास उच्च मुल्यांकित शेती तंत्रज्ञानकडे वळविण्याचे दृष्टिने त्यांना प्रशिक्षीत करणे. कृषि, फलोत्पादन, दुग्धव्यवसाय, मत्स्यशेती, पशुसंवर्धन इ. विविध विभागांच्या योजनांची जोड देऊन सर्वांगिण विकास साधणे हे नियोजनांचे प्रमुख अंग बनेल.याशिवाय शेतात मृद व जल संधारणासाठी समपातळी बांध,ग्रेडेड बंडीग, कंपार्टमेंट बंडीग यासारख्या योजना राबवाव्यात.शेतीसाठी जलसिंचनांचा स्त्रोत निर्माण करण्यासाठी शेततळी अथवा विहीरींचे नियोजन करणे हाही भविष्यातील नियोजनांचा प्रमुख भाग राहील.

कृषि विभागाच्या विविध योजनांतर्गत अनुसुचित जमातीतील पात्र लाभार्थ्यांना योजनांच्या प्रशिक्षणांचा लाभ अग्रक्रमाने देणे आवश्यक आहे.या करीता कृषि विकास अधिकारी जिल्हा परिषद यांनी संबधीत जिल्हयांच्या जिल्हा अधिक्षक कृषि अधिका-यांनी संपर्कात राहून या वर्गातील शेतकरी/निवडलेले लाभार्थी प्रशिक्षीत करण्याची याची

दक्षता घ्यावी निवड झालेल्या शेतकऱ्यांची तालुका निहाय यादी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी व तालुका कृषि अधिकारी यांना पाठवावी.

बिजोत्पादन, इतर योजनांतील निविष्ठा, कृषि यांत्रिकीकरणांतर्गत औजारे,फलोत्पादन विभागाकडील विविध योजनांचा लाभ, त्या-त्या योजनांच्या मार्गदर्शक सुचनांप्रमाणे घेण्यास संबधीत लाभार्थी पात्र राहतील. एकात्मीक पाणलोट विकासाच्या उपचारांचा व कृषि विस्तार व प्रशिक्षण योजनांतील अन्य योजनामधुन या योजनातील बाबी व्यतिरीक्त बाब अग्रक्रमाने शासनाने निर्धारीत केलेल्या प्रमाणानुरुप देण्याबाबत निवड समितीने संबधीत अधिका-यांना सुचना दयाव्यात.

लाभार्थींना अनुदान वजा जाता उर्वरीत रक्कमेसाठी पतपुरवठा करण्याबाबत नोडल अधिकारी, (राष्ट्रीयकृत बँक) यांचेकडुन तसेच सहकारी पतपुरवठा संस्थाकडुन लाभार्थींची कर्ज प्रकरणे मंजुर करण्याबाबत निवड समितीने शिफारस केल्यानंतर निवड समिती सचिवांनी बँकाशी संपर्क साधुन पतपुरवठा वेळेत होईल या दृष्टिने आवश्यक पाठपुरावा करावा.

१२. तांत्रिक मान्यता :- योजनेच्या मार्गदर्शक सूचना याच योजनेसाठी तांत्रिक मान्यता समजण्यात याव्यात.

१३. मासिक प्रगती अहवालः योजनेचा मासिक प्रगती अहवाल विहीत प्रपत्र १ (अ) आणि १ (ब) मध्ये प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यन्त कृषि आयुक्तालयास व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास विभाग यांना नियमीतपणे पाठविण्यात यावा. व त्याची प्रत इमेलवर कृषि आयुक्तालयास ddappscptsp@rediffmail.com वर पाठवावी. परंतू, असे निदर्शनास येते की, काही जिल्हयांचे अहवाल पाठपुरावा करुनही नियमितपणे प्राप्त होत नाहीत. अशाप्रकारे दुर्लक्ष केल्याचे आढळल्या नाईलाजाने संबंधितांविरुध्द प्रशासकीय कारवाई करणे भाग पडेल याची नोंद घ्यावी. सदर योजनेचा विभागीय स्तरावरुनही अपेक्षित गांभिर्याने आढावा घेला जात नाही असे दिसते. याबाबत विभागीय कृषि सह संचालक यांनी नियमितपणे आढावा घेऊन विभागाचा संकलित अहवाल नियमितपणे कृषि आयुक्तालयास पाठविण्याची व्यवस्था करावी.

१४. तपासणीः योजनेची अंमलबजावणी यशस्वीरित्या होण्याच्या दृष्टिने विहीत प्रपत्र २अ नमुन्यात खालीलप्रमाणात तपासणी करण्यात यावी.

| | पदनाम | | तपासणीची टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | विभागीय कृषि सह संचालक (कार्यालयातील वर्ग -१ व त्या पुढील अधिकारी) | -- | ०.७५टक्के |
| | (विभागातील कार्यक्रमाच्या लक्षांका प्रमाणे प्रत्यक जिल्हयात तपासणी होईल याची दक्षता घ्यावी.) | | |
| २. | कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद - सर्व पंचायत समितीमध्ये संख्येच्या सम प्रमाणांत | -- | ५ टक्के |
| ३. | जिल्हा कृषि अधिकारी (वि.घ.यो.) – सर्व पंचायत समितीमध्ये संख्येच्या सम प्रमाणांत | -- | १० टक्के |
| ४. | कृषि अधिकारी (वि.घ.यो.) पंचायत समितीस्तर | -- | १०० टक्के |

कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद व विभागीय कृषि सह संचालक यांनी केलेल्या तपासणीचा अहवाल सोबत जोडलेल्या प्रपत्र - २ ब मध्ये कृषि आयुक्तालयास दर महिन्याच्या १० तारखेपर्यंत सादर करावा. प्रत्येक तालुक्यात सर्व बाबींची समप्रमाणात तपासणी करण्यात यावी.

सोबत : १) परिशिष्ट (एक) व (दोन)
२) प्रपत्र – १, २ (अ), २ (ब)

स्वाक्षरीत /-
संचालक
(विस्तार व प्रशिक्षण)
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे

परिशिष्ट - एक

आदिवासी उप योजना क्षेत्रातील (टिएसपी) व आदिवासी उप योजना क्षेत्राबाहेरील (ओटिएसपी) योजना सन २०१४-१५ अंतरिम मार्गदर्शक सुचना

बाबनिहाय अनुज्ञेय अनुदान मर्यादा

| अ.क्र | बाब | अनुदानाची टक्केवारी | उच्चतम अनुज्ञेय अनुदान मर्यादा (रुपये) |
|---|---|---|---|
| ०१ | जमीन सुधारणा (१ हेक्टर मर्यादेत ) | १०० | मृद संधारण निकषानुसार एक हेक्टर क्षेत्रा करीता रु.४०,०००/- |
| ०२ | निविष्ठा वाटप (१ हेक्टर मर्यादेत ) | १०० | रु.५,०००/- |
| ०३ | पीक संरक्षण/शेतीची सुधारित अवजारे | १०० | रु.१०,०००/- |
| ०४ | बैलजोडी/ रेडेजोडी | १०० | रु. ३०,०००/- |
| ०५ | बैलगाडी | १०० | रु. १५,०००/- |
| ०६ | जुनी विहिर दुरुस्ती | १०० | रु.३०,०००/- नाबार्डच्या निकषानुसार |
| ०७ | इनवेल बोअरिंग | १०० | रु.२०,०००/- नाबार्डच्या निकषानुसार |
| ०८ | पाईप लाईन | १०० | नाबार्डच्या निकषानुसार रु.२०,०००/- |
| ०९ | पंपसंच | १०० | रु.२०,०००/- |
| १० | नवीन विहिर | १०० | रु. ७०,०००/- ते रु.१,००,०००/- ( रोहयो अंतर्गत जवाहर योजने नुसार ) |
| ११ | शेततळे | १०० | रु.३५,०००/- मृ.सं निकषानुसार |
| १२ | परसबाग कार्यक्रम | १०० | रु.२००/- प्रति लाभार्थी ( फ़लोत्पादन विभागाच्या निकषानुसार ) |
| १३ | तुषार/ ठिबक सिंचन संच पुरवठा | १०० | रु. २५,०००/- च्या प्रति हेक्टर ( फ़लोत्पादन विभागाच्या निकषानुसार ) |

टिप : १) वरील घटकांपैकी जे लाभार्थी नविन विहीर या घटकाचा लाभ घेतील, त्यांच्यासाठी प्रति लाभार्थी अनुदानाची उच्चतम मर्यादा रु. ७०,०००/- ते १,००,०००/- पर्यत अनुज्ञेय राहील. मात्र, विहीर खोदण्यासाठी खर्च कमी झाल्यास प्रत्यक्ष खर्चाच्या मर्यादेइतकेच अनुदान अनुज्ञेय राहील, शिल्लक अनुदानातुन अन्य बाबींचा लाभ अनुज्ञेय राहणार नाही.

२) जे लाभार्थी नविन विहीर या घटकाचा लाभ घेणार नाहीत, त्यांच्यासाठी अनुदानाची उच्चतम अनुज्ञेय मर्यादा रु. ५०,०००/- राहील.

परिशिष्ठ - (दोन )

(अ) घटकनिहाय अनुदान व स्वरूप

1. जमीन सुधारणाः जमीन सुधारणा करण्यासाठी १ हेक्टर पर्यंत रु.४०,०००/- च्या उच्चतम मर्यादेत १०० टक्के अनुदान अनुज्ञेय राहील किंवा ग्राम विकास व जलसंधारण विभागाने निश्चित केलेल्या निकषानुसार उच्चतम मर्यादेचे अधिन राहून अनुदान अनुज्ञेय राहील. सदर घटकांचे निकषांमध्ये वेळोवेळी होणारे बदलही लागू राहतील. या घटकांतर्गत नवीन भात खाचर (मजगी) या बाबींचा लाभ देण्यात यावा. जमीन सुधारणा या बाबींसाठी रु ४०,०००/- पेक्षा जादा येणारा खर्च लाभार्थींने स्वतः करावयाचा आहे.

2. निविष्ठा पुरवठाः निविष्ठा पुरवठया करीता रक्कम उच्चतम मर्यादा रु.५०००/- पर्यत १०० टक्के अनुज्ञेय राहील. या बाबींमध्ये शेतक-यांना बियाणे, खते व पीक संरक्षण औषधे यांचा पुरवठा करण्यात यावा. निविष्ठांचा पुरवठा करतांना भौगोलिक परिस्थितीचा अभ्यास करुन त्या भागात होणा-या प्रचलित पिकांच्या बियाण्याचे संकरीत/ सुधारित/अधिक उत्पादन देणारे वाण यांचा पुरवठा करावयाचा आहे. पिक उत्पादन आराखड्या प्रमाणे निविष्ठा वाटपाचा आराखडा तयार करण्यात यावा व त्याप्रमाण निविष्ठांचा हंगामापूर्वी पुरवठा करण्याची दक्षता घ्यावी.

निविष्ठा पुरवठा हा एक हेक्टर क्षेत्राच्या मर्यादेत करण्यांत यावा. किटकनाशके /रासायनिक खते यांचा पुरवठा राज्यस्तरीय दर निश्चिती समितीने निर्धारीत केलेल्या दरानुसार व संचालक (नि.व गु.नि.) यांच्या मार्गदर्शक सुचनांचे अधिन राहून शासन नियुक्त पुरवठा संस्थांकडूनच करावा. बियाणांची खरेदी महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ/कृषि वि'ापीठे यांचेकडून करण्यात यावी. या घटकाचा लाभ खरीप/रब्बी व उन्हाळी या तिन्ही हंगामात अथवा एकाच हंगामात देता येईल. मात्र, या बाबी करीता कमाल मर्यादेपेक्षा अधिक अनुदान अनुज्ञेय राहणार नाही. शेतक-यांना माहीती देवून एकात्मिक किड व्यवस्थापनासाठी उद्युत करावे.

3. पिक संरक्षण अवजारे व शेतीची सुधारित अवजारेः या बाबी अंतर्गत पीक संरक्षण औजारे व शेतीची सुधारित अवजारे यांचा शासनाने निर्धारीत केलेल्या दराने व शेतक-यांच्या मागणी प्रमाण पुरवठा करण्यात यावा. शेतक-यांना या बाबींवर लाभ देतांना शेतक-यांस कोणत्या अवजारांची आवश्यकता आहे हे त्यांच्याकडून लेखी घेऊन त्यानुसारच अवजारांचा पुरवठा करावा. संचालक, एनसीआयपीएम यांच्या दि. २३/४/२०१२ च्या पत्रानुसार पीक संरक्षणासाठी प्रकाश सापळयांच्या वापराची शिफारस केली आहे. या घटकासाठी उच्चतम अनुज्ञेय अनुदान मर्यादा रुपये १०,०००/- मर्यादेत अनुज्ञेय राहील. शासनाने निर्धारित केलेल्या दरानुसार व संचालक (नि.व गु.नि.) यांच्या मार्गदर्शक सुचनांचे अधिन राहून शासन नियुक्त पुरवठादार संस्थांकडून सदर घटकाचा करावा.

4. बैलजोडी/रेडेजोडीः बैलजोडी/रेडेजोडी याबाबीकरिता उच्चतम अनुज्ञेय अनुदान मर्यादा रु.३०,०००/- च्या मर्यादेत अनुज्ञेय राहील. बैलजोडी/रेडेजोडी यांचा पुरवठा लाभार्थ्यांच्या मागणीनुरुप करावा. बैलजोडीची खरेदी नियमित जनावरांच्या बाजारात लाभार्थ्यांच्या संमतीनुसार, पशुवैद्यकीय अधिकारी, जिल्हा कृषि अधिकारी (विघयो), जिल्हा परिषद व कृषि अधिकारी (विघयो) यांच्या उपस्थितीत करावी. बैलजोडी सुदृढ व शेती कामास योग्य असल्याबाबत पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांकडून प्रमाणपत्र घेण्यांत यावे. खरेदीचा व्यवहार झाल्यानतंर बैलजोडीचा विमा उतरविण्यात यावा व निशाणी म्हणून टूटूइंग करुन (गोंदवून) घ्यावे. लाभार्थीचा बैलजोडी समवेत पोस्टकार्ड साईजचा फोटो काढावा व सदर फोटो संबधित अधिकाऱ्यांनी तपासणीचे वेळेस उपलब्ध करुन द्यावा. ज्या लाभार्थ्यांकडे स':स्थितीत स्वतःची बैलजोडी आहे अशा लाभार्थ्यांना बैलजोडी/ रेडेजोडीचा लाभ अनुज्ञेय नाही.

४.१. बैल जोडी/रेड जोडीची मागणी करणा-या शेतक-यांचा लेखी स्वरूपात अर्ज घ्यावा.

४.२. या अर्जासोबत संबधीत शेतक-याकड सध्या बैलजोडी/रेडेजोडी नसल्याचे ग्रामसेवकाचे प्रमाणपत्र घ्यावे.

४.३. प्राप्त मागणीनुसार अर्जाची छाननी कृषि अधिकारी (विघयो), पंचायत समिती यांनी करून गट विकास अधिकारी यांचे शिफारशीसह कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद यांचेकड पाठविण्यात यावेत.

४.४. जिल्हा कृषि अधिकारी (विघयो) जि.प. यांनी प्राप्त अर्जाची छाननी करावी. बैलजोडी/रेडजोडी खरेदी केल्यानंतर खरेदीची कागदपत्रे सादर करताच त्याबाबत खात्री करुन उच्चतम अनुदान मर्यादा रक्कम रु.३०,०००/- किंवा त्यापेक्षा खरेदी किंमत कमी असल्यास प्रत्यक्ष खरेदीची रक्कम लाभार्थींच्या बॅन्क खात्यात जमा करावी.

5. बैलगाडीः बैलगाडी या घटकांसाठी उच्चतम अनुदान मर्यादा रु.१५,००० /- च्या मर्यादेत अनुज्ञेय राहील. बैलगाडीची खरेदी करतांना परिशिष्ट दोन मधील मुद्दा (ब) नुसार शासनाने निर्धारित केलेल्या दराने व शासननियुक्त पुरवठा संस्थांकडून करण्यात यावी. बैलगाडीचा पुरवठा केल्यानतंर बैलगाडीच्या दर्शनी भागावर योजनेचे नाव व पुरवठा केल्याचे वर्ष लिहीलेले ३X२ इंच आकाराचे पत्र्याचे ठळक लेबल लावावे अथवा लाकुड असलेल्या भागात कोरुन घ्यावे. याबाबत संचालक (नि.व गु.नि.) यांच्या मार्गदर्शक सुचनांचे अधिन राहून शासन नियुक्त पुरवठा संस्थांकडून पुरवठा करावा.

6. जुनी विहिर दुरुस्ती : या बाबी अंतर्गत नाबार्डने निर्धारित केलेल्या निकषांच्या आधारे उच्चतम अनुज्ञेय अनुदान रु.३०,०००/- च्या मर्यादेत अनुदान अनुज्ञेय राहील. जादा रक्कम लागल्यास ती लाभार्थीने स्वतः उभी करावयाची आहे. लाभार्थ्यांनी जुन्या विहिरींची कामें करतांना त्याचे अंदाजपत्रक तयार करुन उप अभियंत्याकडुन तांत्रिक मान्यता घ्यावी व कृषि अधिकारी (विघयो) पंचायत समिती यांनी झालेल्या कामाचे मोजमाप करुन खर्चाचे प्रमाणातच अनुदानाचा लाभ देण्यात यावा. नाबार्डकडुन याबाबतच्या निकषात वेळोवेळी जे बदल करण्यांत येतील ते बदल या योजने करीता लागु राहतील. या घटकाचा लाभ घेतला असेल तर अशा लाभार्थ्यांना इनवेल बोअरिंग घटकाचा लाभ अनुज्ञेय राहणार नाही.

7. इनवेल बोअरींगः या बाबीसाठी नाबार्डने निर्धारित केलेल्या खर्चाच्या प्रमाणकांप्रमाणे उच्चतम अनुज्ञेय अनुदान रु.२०,०००/- मर्यादेत अनुदान अनुज्ञेय राहील. इनवेल बोअरींगचे काम करतांना खर्चाचे अंदाजपत्रक व तांत्रिक निकषानुसार ठिकाणाची योग्यता (Feasibility Report) याबाबत भुजल सर्वेक्षण यंत्रणेकडून प्राप्त करुन घ्यावा. कृषि अधिकारी (विघयो), पंयाचत समिती यांनी झालेल्या कामाची मोजमापे घेऊन प्रत्यक्ष खर्चाचे प्रमाणात अनुदानाचा लाभ देणेंत यावा. या घटकाचा लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांना जुनी विहिर दुरुस्तीचा लाभ अनुज्ञेय राहणार नाही.

8. पाईप लाईनः या बाबी अंतर्गत लाभार्थीस नाबार्डने निर्धारित केलेल्या खर्चाचे प्रमाणकांनुसार उच्चतम अनुज्ञेय अनुदान रु.२०,०००/- या मर्यादेत अनुदान अनुज्ञेय राहील. पाईप लाईनची खरेदी परिशिष्ट दोन मधील मु'ा (ब) नुुसार करण्यात यावी. याबाबत शासनाने निर्धारित केलेल्या दरानुसार व संचालक (नि.व गु.नि.) यांच्या मार्गदर्शक सुचनांचे अधिन राहून शासन नियुक्त पुरवठादार संस्थांकडूनच पुरवठा करावा.

9. पंपसंचः शासनाने दर निश्चिती केलेले विद्युत पंपसंच/ऑईल इंजिनचा पुरवठा उच्चतम अनुज्ञेय अनुदान रु. २०,०००/- च्या मर्यादेत सिंचन स्त्रोत उपलब्ध असणा-या शेतक-यांना अनुदानावर करावा. पंपसंच खरेदी परिशिष्ट दोन मधील मुद्दा (ब) नुसार करण्यात यावी. याबाबत संचालक (नि.व गु.नि.) यांच्या मार्गदर्शक सुचनांचे अधिन राहून शासन नियुक्त पुरवठादार संस्थांकडून पुरवठा करावा. सिंचनासाठी पाण्याची उपलब्धता व विद्युत कनेक्शन लाभधारकाकडे असल्याची खात्री कृषि अधिकारी, पंचायत समिती यांनी करावी व त्यानुसार विद्युत पंपाचा लाभ शेतक-यांना देण्यात यावा.

10. नवीन विहीर खोदणेः या घटकासाठी रोजगार हमी योजनेअंतर्गत जवाहर विहीर योजनेला जे आर्थिक निकष वेळोवेळी निर्धारीत करण्यात येतील, त्या निकषांप्रमाणे अनुदान अनुज्ञेय राहील. सदरचा कार्यक्रम राबविताना महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत जवाहर विहीर कार्यक्रमाच्या सुधारीत मापदंडानुसार

(शा.नि.क्र.रोहयो-२००७/प्र.क्र.१७९/रोहयो-१ मंत्रालय मुंबई-३२ दि.१० एप्रिल २००८) भुस्तरानिहाय नवीन विहीरी करीता खर्चाचे मापदंड लागु राहतील. त्यानुसार लाभार्थीस रु. ७०,०००/- ते रु.१,००,०००/- मर्यादेत अनुदान अनुज्ञेय राहील. तसेच शासन पत्र क्र विघयो/१००२/प्रक्र ७३/भाग १/२१अे, दि. १३ मार्च २००३ अन्वये या योजनेअंतर्गत किमान क्षेत्राची अट ०.४० हेक्टर निश्चित करण्यात आली आहे. त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

| अ.क्र. | भुस्तराचा प्रकार | जिल्हे | प्रति नवीन विहिर अनुज्ञेय अनुदान मर्यादा (रु.) |
|---|---|---|---|
| १ | वालुकामय व मेटामार्फीक (रुपांतरीत) विदर्भातील भाग आणि तापी पुर्णा खोऱ्यातील भाग | गडचिरोली, भंडारा, गोंदिया,चंद्रपूर, नागपूर, अकोला, वाशिम, अमरावती, बुलढाणा, धुळे,नंदूरबार जळगांव, कोल्हापूर, सिंधूदुर्ग, रत्नागिरी | १,००,०००/- |
| २ | दख्खन पठारचा प्रदेश | नागपूर, वर्धा, अमरावती, यवतमाळ, अकोला,वाशिम, बुलढाणा, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, अहमदनगर, नाशिक,नंदुरबार, धुळे, जळगांव, उसमानाबाद, औरंगाबाद, लातूर, जालना, परभणी, हिंगोली, बीड, नांदेड, | १,००,०००/- |
| ३ | जांभ्या खडकाचा प्रदेश (किनारपट्टीचा भाग ) | ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधूदुर्ग | ७०,०००/- |

वरील तक्त्यात दर्शविल्यानुसार नवीन विहीर घटकाकरीता खर्चाचे मापदंड असून भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेचे प्रमाणपत्र घेणे बंधनकारक राहील. नवीन विहीर या घटका खाली लाभार्थीस अनुदान देतांना भूस्तरीय रचना व अंदाजपत्रकातील घटकानुसार झालेल्या प्रत्यक्ष कामाचे मोजमापानुसार अनुदान अदा करावे. प्रत्यक्षात झालेल्या खर्चाप्रमाणे अनुदान उच्चतम मर्यादेनुसार रक्कम शिल्लक राहत राहील्यास त्यामधुन अन्य बाबींचा लाभ लाभार्थीस अनुज्ञेय नाही. "नवीन विहीर" या घटकाचा लाभ घेणा-या लाभार्थ्यांस अन्य कोणत्याही घटकाचा लाभ अनुज्ञेय नाही. लाभार्थीस दोन आर्थिक वर्षात पूर्ण लाभ देण्याचे दृष्टीने विहीरीचे काम सदर कालावधी पूर्ण घेण्याबाबत संबंधीतांनी दक्षता घ्यावी.

11. शेततळेः मृद व जलसंधारण विभागाच्या निकषांनुसार व रोजगार हमी योजनेच्या मापदंडाप्रमाणे उच्चतम अनुज्ञेय अनुदान रुपये ३५,०००/- च्या मर्यादेत अनुज्ञेय राहील.

12. परसबाग : शेतक-यांना परसबागेसाठी प्रति लाभार्थी रुपये २००/- प्रमाणे उच्चतम मर्यादेत अनुदान अनुज्ञेय राहील. मध्ये भाजीपाल्याची पिके उदा. शेवगा, टोमॅटो ,कांदा, वांगी, भेंडी इत्यादीचा समावेश राहील.

१३. सुक्ष्म सिंचन (तुषार/ठिबक संच) पुरवठाः फलोत्पादन विभागाच्या तुषार व ठिबक सिंचन कार्यक्रमानुसार शेतक-यांना सिंचन क्षेत्रात वाढ करण्यासाठी तुषार/ठिबक संचाचा पुरवठा उच्चतम अनुज्ञेय अनुदान मर्यादेत रु.२५०००/- प्रती हेक्टर प्रमाणे अनुज्ञेय राहील. संचाची खरेदी कृषि विभागाच्या मान्यता प्राप्त उत्पादकांकडून करावी व संचाचा दर्जा आयएसआय प्रमाणीत असावा. संचाची तपासणी कृषि अधिका-यांनी (विघयो) केल्यानंतर अनुदान अनुज्ञेय राहील.

(ब) कृषि औजारे मागणी व पुरवठा गुणनियंत्रणः

कृषि संचालक, (निविष्ठा व गुण नियंत्रण) यांनी विविध केंद्र/राज्य पुरस्कृत योजनांतर्गत अनुदानावर पुरविण्यात येणाऱ्या कृषि औजारांचे बाबत खरेदी प्रक्रीया, औजारांची स्पेसीफिकेशन्स व गुणवत्ता तपासणी इत्यादी बाबत वेळोवेळी निर्गमीत केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार कार्यक्रमाची काटेकोर अंमलबजावणी करण्यात यावी. मंजूर आर्थिक/भौतिक मर्यादेपेक्षा जास्त व प्रत्यक्ष गरजेपेक्षा अधिक व शेतकऱ्यांची मागणी नसलेल्या औजारांची कोणत्याही परिस्थितीत मागणी नोंदवू नये. मागणीनुसार पुरवठा केलेली कोणतीही औजारे पडून राहणार नाहीत, याची सर्वस्वी जबाबदारी मागणी नोंदविणाऱ्या अधिकाऱ्यांची राहील. मागणी केलेली औजारे त्याच हंगामात वितरीत करण्याची जबाबदारी संबंधित गट विकास अधिकारी/कृषि अधिकारी पंचायत समिती यांची राहील. औजारे विनावाटप पडून राहील्याचे आढळून आल्यास मागणी नोदंविणाऱ्या अधिकाऱ्यास जबाबदार धरुन शिल्लक राहिलेल्या औजारांच्या किंमती एवढ्या रकमेची एकरकमी वसुली करण्यात येईल. तसेच, संबंधितांविरुध्द प्रशासकीय कारवाई प्रस्तावित करण्यात येईल. सन २०१४-१५ साठी शासनाने दरनिश्चिती केल्यावर शासन निर्णय व संचालक (नि. व गु.नि.) यांचेकडून निर्गमित होणाऱ्या मार्गदर्शक सूचना जशाच्या तशा लागू राहतील.

कृषि आयुक्तालयाचे परिपत्रक.जा.क्र.कृषि/१६ सीबीसेल/लाभार्थी/४७०/२०१२, दि.१२/०३/२०१२ नुसार ज्या प्रकरणी अनुदान वजा जाता लाभार्थी हिश्श्याची रक्कम वसूल करावयाची आहे तेथे ती संबंधितांकडून रोख अथवा डी.डी. स्वरुपात वसुल करुन या रकमेची लाभार्थ्यांना शासकीय जमा पोचपावती देण्यात यावी. तसेच, वसुल केलेली रक्कम अथवा डी.डी. तात्काळ संबंधित कर्मचाऱ्यांनी त्यांच्या कार्यालयातील रोखपालाकडे जमा करावीे. रोखपालाने या रकमेची नोंद रोखवही मध्ये घेवून कार्यालयाच्या आहरण व संवितरण अधिकाऱ्यांच्या बँक खात्यात त्वरीत जमा करावी. याप्रमाणे कार्यवाही न केल्यास, ती वित्तीय अनियमीतता समजून संबधीत मागणी नोंदविणा-या अधिका-या विरुध्द प्रशासकीय कारवाई केली जाईल. लाभार्थी हिश्यासह पुरवठा संस्थेची देयके अदा करणे ही मागणी नोंदविण्या-या अधिका-याची सर्वस्वी जबाबदारी राहील.

अनुदानाची द्विरुक्तीः

उपरोक्त योजनेंतर्गत १४ बाबींसाठी अनुदान देण्यात येत आहे. इतर योजनेमधूनही या बाबींसाठी अनुदान देण्याची तरतूद आहे. तेव्हा लाभार्थीस एकाच घटकासाठी दोन योजनेमधून अनुदान दिले जाणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. या योजनेतील नविन विहीर या घटकाचा लाभ घेतल्यानतंर पुढे सदर लाभार्थ्यास या योजनेतून नविन विहीर तसेच इतर कोणत्याही घटकाचा लाभ कधीही अनुज्ञेय राहणार नाही. बैलजोडी या घटकाचा लाभ घेतल्यानतंर सदर लाभधारकाला किमान पुढील पाच वर्षापर्यंत इतर योजनेतून बैलजोडी घटकाचा लाभ देण्यात येवू नये. जे लाभार्थी नविन विहीर या घटकाचा लाभ घेणार नाहीत, त्यांना उर्वरित घटकांपैकी रु.५०,०००/- च्या मर्यादेत इतर घटकांचा एकदाच लाभ देय राहील.

स्वाक्षरीत /-
संचालक
(विस्तार व प्रशिक्षण)
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रपत्र — १ (अ)

आदिवासी उपयोजना (क्षेत्रांतर्गत) सन २०१४-१५ अंतर्गत मासिक प्रगती अहवाल

जिल्हा —

अहवाल कालावधी माहे , २०१४ अखेर

जिल्हयासाठी एकूण मंजूर निधी

लेखाशिर्ष - २४०१२१८४

सन २०१४-१५ मध्ये निवडलेले नवीन लाभार्थी संख्या

प्राप्त अनुदान

सन २०१३-१४ मधील उर्वरित लाभ दिलेल्या लाभार्थींची संख्या

| अ. क्र. | बाब | लक्षांक | | | | | | साध्य | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | सन २०१३-१४ मधील | | सन २०१४-१५ मधील | | एकूण | | सन २०१३-१४ मधील | | सन २०१४-१५ मधील | | एकूण | |
| | | उर्वरित लाभ द्यावयाच्या लाभार्थींची संख्या | त्यासाठी लागणारी रक्कम | नविन निवडलेले लाभार्थी संख्या | त्यासाठी लागणारी रक्कम | लाभार्थी संख्या (रकाना ३+५) | लागणारी रक्कम (रकाना ४+६) | उर्वरित लाभ दिलेल्या लाभार्थींची संख्या | दिलेला लाभ रक्कम | नविन लाभार्थीपैकी लाभ दिलेल्या लाभार्थींची संख्या | दिलेल्या लाभाची रक्कम | लाभ दिलेल्या लाभार्थ्यांची संख्या (रकाना ९+११) | लाभ दिलेली रक्कम (रकाना १०+१२) |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ |
| १ | जमीन धारणा | | | | | | | | | | | | |
| २ | निविष्ठा वाटप | | | | | | | | | | | | |
| ३ | कृषि सुधारित औजारे | | | | | | | | | | | | |
| ४ | बैलजोडी | | | | | | | | | | | | |
| ५ | बैलगाडी | | | | | | | | | | | | |
| ६ | इनवेल बोरींग | | | | | | | | | | | | |
| ७ | जुनी विहीर दुरुस्ती | | | | | | | | | | | | |
| ८ | पाईपलाईन | | | | | | | | | | | | |
| ९ | पंपसंच | | | | | | | | | | | | |
| १० | नविन विहीर | | | | | | | | | | | | |
| ११ | शेततळे | | | | | | | | | | | | |
| १२ | परसबाग कार्यक्रम | | | | | | | | | | | | |
| १३ | तुषार/ठिबक सिंचन | | | | | | | | | | | | |
| १४ | अभिकरण शुल्क | | | | | | | | | | | | |
| | एकूण | | | | | | | | | | | | |

प्रपत्र – १ (ब)

आदिवासी उपयोजना (क्षेत्रांबाहेरील) सन २०१४-१५ अंतर्गत मासिक प्रगती अहवाल

अहवाल कालावधी माहे        , २०१४ अखेर

लेखाशिर्ष   - २४०११९६५

प्राप्त अनुदान

जिल्हा –

जिल्हयासाठी एकूण मंजूर निधी

सन २०१४-१५ मध्ये निवडलेले नवीन लाभार्थी संख्या

सन २०१३-१४ मधील उर्वरित लाभ दिलेल्या लाभार्थींची संख्या

| अ. क्र. | बाब | लक्षांक | | | | | | साध्य | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | सन २०१३-१४ मधील | | सन २०१४-१५ मधील | | एकूण | | सन २०१३-१४ मधील | | सन २०१४-१५ मधील | | एकूण | |
| | | उर्वरित लाभ द्यावयाच्या लाभार्थीची संख्या | त्यासाठी लागणारी रक्कम | नविन निवडलेले लाभार्थी संख्या | त्यासाठी लागणारी रक्कम | लाभार्थी संख्या (रकाना ३+५) | लागणारी रक्कम (रकाना ४+६) | उर्वरित लाभ दिलेल्या लाभार्थीची संख्या | दिलेला लाभ रक्कम | नविन लाभार्थीपैकी लाभ दिलेल्या लाभार्थीची संख्या | दिलेल्या लाभाची रक्कम | लाभ दिलेल्या लाभार्थ्यांची संख्या (रकाना ९+११) | लाभ दिलेली रक्कम (रकाना १०+१२) |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ |
| १ | जमीन धारणा | | | | | | | | | | | | |
| २ | निविष्ठा वाटप | | | | | | | | | | | | |
| ३ | कृषि सुधारित औजारे | | | | | | | | | | | | |
| ४ | बैलजोडी | | | | | | | | | | | | |
| ५ | बैलगाडी | | | | | | | | | | | | |
| ६ | इनवेल बोरींग | | | | | | | | | | | | |
| ७ | जुनी विहीर दुरुस्ती | | | | | | | | | | | | |
| ८ | पाईपलाईन | | | | | | | | | | | | |
| ९ | पंपसंच | | | | | | | | | | | | |
| १० | नविन विहीर | | | | | | | | | | | | |
| ११ | शेततळे | | | | | | | | | | | | |
| १२ | परसबाग कार्यक्रम | | | | | | | | | | | | |
| १३ | तुषार/ठिबक सिंचन | | | | | | | | | | | | |
| १४ | अभिकरण शुल्क | | | | | | | | | | | | |
| | एकूण | | | | | | | | | | | | |

# प्रपत्र – २ (अ)

सन २०१४-१५ मध्ये आदिवासी उपयोजना (क्षेत्रांतर्गत व क्षेत्राबाहेरील) अंतर्गत आदिवासी शेतकऱ्यांना शेतीसाठी अर्थ सहाय्य देण्याची योजना

तपासणीचे प्रपत्र

1. तपासणी अधिकाऱ्याचे नाव व पदनाम
2. तपासणी दिनांक
3. तपासणी केलेल्या लाभार्थीचे नाव व पत्ता
4. लाभार्थीने केलेल्या मागणी केलेल्या बाबी एकूण
5. दिलेल्या लाभाचा तपशील व रक्कम
6. घटकनिहाय पुरवठा संस्थेचे नाव
7. उत्पादकाचे नाव
8. प्राप्त झाल्याचा दिनांक
9. लाभ दिलेल्या घटकाची रक्कम
10. अनुदानाची रक्कम

    नवीन विहीर या घटकाचा लाभ घेतलेल्या लाभार्थी बाबत माहिती

    अ) नवीन विहीर घेतलेल्या क्षेत्राचा सर्वे नंबर

    ब) नवीन विहीरीचा अंदाजपत्रकीय खर्च

    क) तपासणीच्या दिनांकास विहीरीच्या कामाची स्थिती

    ड) तपासणीच्या दिनांकास विहीरीवर झालेला खर्च

11. इ) लाभार्थीस दिलेले अनुदान
12. लाभार्थ्यांचे अभिप्राय

तपासणी अधिकाऱ्याचे अभिप्राय

तपासणी दिनांक तपासणी अधिकाऱ्याची स्वाक्षरी

## प्रपत्र –२ (ब)

सन २०१४-१५ आदिवासी उपयोजना अंतर्गत लाभार्थी तपासणीचा मासीक अहवाल

विभाग ----------जिल्हा -----------                                         माहे ----------- अखेर

| अ. क्र. | तपासणी अधिका-याचे नाव | पदनाम | लाभ दिलेल्या लाभार्थीची संख्या | | तपासणी केलेल्या लाभार्थीची संख्या | | | तपासणी केलेल्या औजारांची संख्या | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | महिन्यात | दि. १/४/१४ पासून | महिन्यात | दि. १/४/१४ पासून | तपासणीची टक्केवारी | महिन्यात | दि. १/४/१४ पासून | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| | | | | | | | | | | |

दिनांक :-

तपासणी अधिका-याची स्वाक्षरी